# डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी), पुणे

(महाराष्ट्र शासनाच्या सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाची स्वायत्त संस्था)
२८, क्वीन्स गार्डन, कॅम्प, पुणे - ४११००१.

## डॉ. बाबासाहेब आंबेडकर राष्ट्रीय संशोधन अधिछात्रवृत्ती (BANRF) -२०१७
## महाराष्ट्रातील अनुसूचित जातीतील एम. फिल / पीएच. डी. करणाऱ्या विद्यार्थ्यांकरिता

**डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी उच्च शिक्षणासाठी १०४ वर्षांपूर्वी १९१३ साली कोलंबिया येथे प्रस्थान केले, या ऐतिहासिक घटनेच्या स्मरणार्थ "डॉ. बाबासाहेब आंबेडकर राष्ट्रीय संशोधन अधिछात्रवृत्ती" सुरु करण्यात आली असून २०१७ करिता १०४ अधिछात्रवृत्ती आहे.**

**अनुसूचित जातीतील संशोधकांना संशोधनाकरिता प्रोत्साहित व सहाय्य करण्यासाठी (BANRF) –२०१७ योजनेंतर्गत १०४ अधिछात्रवृत्ती प्रदान करण्यात येतील.**

**पात्रता :-**

१. उमेदवार महाराष्ट्रातील रहिवासी व अनुसूचित जातीचा असावा.
२. दि. १ ऑक्टोबर, २०१६ रोजी किंवा त्यानंतर प्रवेश/नोंदणी दिनांक असणारे उमेदवार एम.फिल साठी अर्ज करु शकतात.
३. दि. १ जानेवारी, २०१६ रोजी किंवा त्यानंतर प्रवेश/नोंदणी दिनांक असणारे उमेदवार पी. एच.डी. साठी अर्ज करु शकतात.
४. नोंदणीकृत नसलेल्या अर्जदाराने M.Phil. / PET / SET / NET / GATE यापैकी कमीत कमी एक परीक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक आहे, अन्यथा असे उमेदवार (BANRF) –२०१७ करिता अपात्र ठरतील.
५. उमेदवाराचे वय दिनांक १५ जुलै, २०१७ रोजी ५५ वर्षांपेक्षा अधिक नसावे.

**आरक्षण :-** १. अनुसूचित जातींतील महिलांसाठी ५०% जागा आरक्षित   २. अनुसूचित जातींतील नि:समर्थ व्यक्तींसाठी ०३% जागा आरक्षित

सर्व उमेदवारांना कळविण्यात येते कि, (BANRF) –२०१७ करिता ऑनलाईन अर्ज करावयाचा असून सदर अर्जाची वेबलिंक, उमेदवारांकरिता सूचना, (BANRF) –२०१७ अधिछात्रवृत्ती संदर्भातील मार्गदर्शक तत्वे आणि (घोषणापत्र) Declaration Certificate बार्टीच्या **http://barti.maharashtra.gov.in,< Online Application (BANRF) – २०१७** या संकेतस्थळावर **दिनांक १९ जून २०१७,** पासून उपलब्ध केले जाईल.

अर्जदारांनी ऑनलाईन अर्ज भरल्यानंतर त्यांच्या ई–मेलवर प्राप्त झालेल्या अर्जाच्या प्रतीसोबत आवश्यक स्व: साक्षांकित केलेली कागदपत्रे जोडून बार्टी कार्यालयामध्ये **दिनांक १५ जुलै, २०१७ पर्यंत कार्यालयीन वेळेत पोहोच करावीत.**

**ऑनलाईन अर्ज दिनांक १९ जून, २०१७ रोजी दुपारी ०२:०० वाजेपासून दिनांक १० जुलै २०१७, रात्री ११.५९ पर्यंत स्वीकारले जातील, त्यानंतर अर्ज स्विकारण्यासाठीची वेबलिंक बंद करण्यात येईल.**

**राजेश ढाबरे, भारासे**
महासंचालक,बार्टी

**Advt/Research/16/06/2017/76**